दुरध्वनी क्र. 022 25421373
25434349
इमेल - dcfthane@gmail.com
dycftahne@mahaforest.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वनविभाग**

# उप वनसंरक्षक ठाणे वनविभाग ठाणे यांचे कार्यालय

मॅरेथॉन सर्कल,लाल बहादुर शास्त्री मार्ग नौपाडा ठाणे - 400 602

पत्र जा.क्र.कक्ष -25/अ/मोजणी/एफसीए/345/2026-27 दिनांक - 27 /05/2026

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे

**विषय** - Proposal for diversion of 32.357 ha. forest land under VAN (SANRAKHSAN EVAM SAMVARDHAN) ADHINIYAM, 1980 for construction of Alyani Minor Irrigation Scheme in Parhe Village in Dist. Thane in the State of Maharashtra. (FP/MH/IRRIG/23779/2017).

**संदर्भ** -
1. अवर सचिव, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी-1224/प्र.क्र.154/फ-10 दि. 03/07/2024.
2. प्रधान मुख्य वनसरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17/ नोडेल/ठाणे/एस-1/पीआयडी-23779/24-25/819 दि. 03/07/2024.
3. आपलेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.65/2018-19/जा.155 दि. 09/08/2024.
4. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-25/ब/मोजणी/एफसीए/1857 दि. 11/07/2024.
5. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा यांचेकडील पत्र क्र. जिजअ(मृवज) विभाग/ प्रशा-4/2185 दि. 09/07/2025.

वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत अल्याणी लघुपाटबंधारे योजना, ता.मुरबाड, जि. ठाणे वनजमिन मागणी प्रस्तावाबाबत अवर सचिव, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भिय पत्रान्वये 1 ते 12 मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मुद्दांचा पुर्तता अहवाल सादर करण्याबाबत प्रकल्प यंत्रणेस संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये या कार्यालयाकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र. 5 अन्वये प्रकल्प यंत्रणेने अहवाल सादर केला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे पुर्तता अहवाल सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | अनुपालन |
|---|---|---|
| 1. | प्रकल्पामध्ये चौकी बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून, सदर चौकीसाठी वनजमिनीची आवश्यकता नसल्याचे नमुद केले आहे. परंतु, KML फाईलच्या अवलोकनावरून प्रस्तावित केलेली चौकी वनजमिनीवर असल्याचे दिसून येते, याबाबत खातरजमा करावी. | प्रस्तावित प्रकल्पामधील चौकी बांधण्याचे ठिकाणची प्रकल्प नकाशा व KML File यानुसार तपासणी केली असता, प्रस्तावित चौकी ही मालकी स.नं. 51 मध्ये येत असून वनजमिनीवर प्रस्तावित नाही, याबाबत खातरजमा केली असलेबाबत प्रकल्प यंत्रणेने कळविले आहे. |

| अ.क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | अनुपालन |
|---|---|---|
| 2. | उप वनसंरक्षक यांच्या पार्ट-2 मध्ये प्रकल्पामध्ये जाणाऱ्या पोहोच रस्त्यासाठी कोणतीही वृक्षतोड होणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र KML फाईलचे अवलोकन केले असता प्रकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या पोहोच रस्त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात वृक्ष असल्याचे दिसून येते. याबाबत फेर तपासणी करून माहिती सादर करावी. | दि. 14/06/2025 रोजी प्रकल्प यंत्रणेसमवेत स्थळपाहणी केली असून त्यानुसार प्रस्तावित पोहोच रस्ता मौजे अल्याणी येथील मालकी स.नं. 46, 51 व खाजगी वन स.नं. 53 मधून प्रस्तावित आहे. प्रस्तावित पोहोच रस्त्यामध्ये मालकी क्षेत्रातील वृक्ष बाधित होत असून खाजगी वन स.नं. 53 मधील वृक्ष बाधित होत नाहीत. (Annexure - 1) |
| 3. | प्रकल्पामध्ये सन 2015 आणि सन 2017 साली करण्यात आलेले स्थळपहणी अहवाल जोडण्यात आले आहेत. मध्यंतरीच्या काळात त्यामध्ये बरेचसे फेरबदल झाले असल्याची शक्यता असल्याने सद्य:स्थितीदर्शक सुधारीत स्थळपहणी अहवाल विहीत नमुन्यामध्ये सादर करावा. | सुधारीत स्थळपाहणी अहवाल विहित नमुन्यामध्ये भरून यासोबत सादर करणेत येत आहे. (Annexure - 2) |
| 4. | प्रकल्पास तांत्रिक मान्यता मिळाल्याचे दस्तावेज सादर करावेत. | प्रकल्पास तांत्रिक मान्यता मिळाल्याचे प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त दस्तऐवज यासोबत सादर करणेत येत आहे. (Annexure - 3) |
| 5. | प्रकल्पामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेल्या मौजे कांदळी सर्व्हे क्र. 37, मौजे महज सर्व्हे क्र. 56 भाग, सर्व्हे क्र. 12, मौजे पऱ्हे सर्व्हे क्र. 3, सर्व्हे क्र. 32, मौजे अल्याणी सर्व्हे क्र. 5, सर्व्हे क्र. 53 चे अधिकार अभिलेख सादर करावेत. | प्रकल्प यंत्रणेकडून प्राप्त मौजे कांदळी सर्व्हे क्र. 37, मौजे महज सर्व्हे क्र. 56 भाग, सर्व्हे क्र. 12, मौजे पऱ्हे सर्व्हे क्र. 3, सर्व्हे क्र. 32, मौजे अल्याणी सर्व्हे क्र. 5, सर्व्हे क्र. 53 चे 7/12 उतारे यासोबत सादर करणेत येत आहे. (Annexure - 4) |
| 6. | प्रकल्पामध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता मान्य करणे) अधिनियम, 2006 अंतर्गत जिल्हाधिकारी यांचे दि. 30/10/2020 रोजीचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात वनहक्कांमध्ये काही बदल झाला आहे किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी. | प्रस्तुत बाबत प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले हमीपत्र (Undertaking) सोबत सादर करणेत येत आहे. (Annexure - 5) |
| 7. | प्रकल्पामध्ये खाजगी वनजमिनीचा समावेश आहे, सबब, सदर खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त सादर करावे. | याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा यांनी वळतेकरण प्रस्तावास तत्वत: मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंतिम मान्यतेपूर्वी खाजगी वनजमिन धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची तजवीज ठेवीत असल्याचे कळविले आहे. |

| अ.क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | अनुपालन |
|---|---|---|
| 8. | प्रस्तावामधील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जसे, उप वनसंरक्षक यांच्या बहुतांश प्रमाणपत्रांवर दिनांक नमुद केलेला नाही, स्थळपाहणी अहवाल सन 2015 व 2017 मधील जुन्या नमुन्यामधील आहे व इतर ही अनुषंगिक कागदपत्रे सुमारे 4-5 वर्षापूर्वीची असल्याची दिसून येतात. सबब, सदर प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे दिनांकासहित, सद्यस्थितीदर्शक व विहीत नमुन्यात सादर करावीत. | याबाबत आवश्यक प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे दिनांकासहित विहित नमुन्यात सादर करणेत येत आहे. (Annexure - 6) |
| 9. | KML File च्या अवलोकनावरून पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे जागजी येथील सर्व्हे नंबर 308 व मौजे निलेगांव येथील सर्व्हे नंबर 176 येथील क्षेत्रावर यापूर्वीच CCT work आणि वृक्ष लागवड केल्याचे दिसून येते. याबाबत फेरतपासणी करून अहवाल सादर करावा. | सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी, धाराशिव यांचेकडील पत्र क्र. 948 दि. 16/07/2024 (सोबत संलग्न) अन्वये पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित मौजे जागजी येथील सर्व्हे नंबर 308 पैकी 20.00 हे. क्षेत्रावर अतिक्रमण होण्याच्या शक्यतेमुळे तात्काळ वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे व मौजे निलेगांव येथील सर्व्हे नंबर 176 मधील 3.500 हे. क्षेत्रात शेतीसाठी अतिक्रमण होवू नये म्हणून जलशोषक चर (CCT) खोदण्यात आल्याचे व सद्यस्थितीत वृक्ष लागवडीस 12.36 हे. क्षेत्र उपलब्ध असल्याचे कळविले आहे. (Annexure - 7) |
| 10. | सदरची प्रस्तावित CA ची जमिन यापूर्वी नेवाडे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी दिली होती. सदर प्रकल्प कार्यान्वीत होणार नसल्यामुळे सदर जमिन या प्रकल्पासाठी CA म्हणून प्रस्तावित केली असल्याचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांच्या दि. 23/06/2015 च्या पत्रावरून दिसून येते. सदरचे पत्र जवळ जवळ 9 वर्षापेक्षा जास्त कालावधीचे असल्याने सद्य:स्थितीत नेवाडे प्रकल्प कार्यान्वीत झाला किंवा कसे, नसल्यास प्रस्तावित CA म्हणून अन्य प्रकल्पास हस्तांतरीत केली किंवा कसे, यासंदर्भात अद्ययावत माहिती सादर करावी. | सदरील प्रस्तावाकरीता CA साठी प्रस्तावित करण्यात आलेली जमिन यापूर्वी नेवाडे लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या बदल्यात देण्यात आली होती. परंतु सदरील प्रकल्प सद्यस्थितीत रद्द झालेला असून सदरील जमीन इतर प्रकल्पाकरीता हस्तांतरीत करण्यात आलेली नसल्याचे प्रकल्प यंत्रणेकडून कळविण्यात आले आहे. |
| 11. | मोजे निलेगाव, गट नं. 176 मधील 12.36 हे. | सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी, |

| अ.क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | अनुपालन |
|---|---|---|
| | सादर करावी. | दि. 16/07/2024 अन्वये मौजे निलेगाव गट नं. 176 मधील 12.36 हे. क्षेत्राची पर्यायी वनीकरणाची 10 वर्षाची योजना सोबत सादर केली आहे. **(Annexure - 7)** |
| 12. | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे निलेगाव, गट नं. 176 मधील 30.00 हे. क्षेत्र यापूर्वी विष्णुपुरी (खंडकोळी) ता. पालघर योजनेसाठी लागणाऱ्या वनजमिनीच्या बदल्यात पर्यायी वनीकरण क्षेत्र म्हणून वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर प्रकल्प सद्य:स्थितीत कार्यान्वीत आहे किंवा कसे ? नसल्यास, सदर जमिन अन्य प्रकल्पासाठी CA म्हणून हस्तांतरीत केली आहे किंवा कसे, याबाबत माहिती सादर करावी. | मौजे निलेगाव, गट नं. 176 मध्ये एकूण 60.00 हे. क्षेत्र असून त्यापैकी अल्याणी लघु पाटबंधारे योजनेच्या पर्यायी वनीकरणासाठी 12.36 हे. क्षेत्र देण्यात आले आहे. तसेच सदरची जमीन अन्य प्रकल्पासाठी हस्तांतरीत केलेली नाही, असे प्रकल्प यंत्रणेकडून कळविण्यात आले आहे. |

त्यानुसार उपस्थित केलेल्या मुद्दांचा पुर्तता अहवाल 3 प्रतीत सोबत सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

(सचिन रेपाळ)
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वनविभाग, ठाणे**

प्रतिलीपी - जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा यांना माहितीसाठी अग्रेषित.